निवडणूक प्राधान्य


# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे

रासनिप्रा

**जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे – ४११००१**

**फोन नं.** - (०२०) २६०५०६४१ **इमेल आयडी** - sceapune@gmail.com


जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-११/नैमित्तिक रिक्त जागा भरणे/कार्यपध्दती निश्चीती/२०२२/3266/ दिनांक १९/०४/२०२२

**वाचावे :-**

१. महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१).

२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (पाच) व नियम ७४.

३. प्राधिकरणाकडील जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-११/अधिकार प्रदान करणे/२२४९, दिनांक १५.०३.२०२२.

**प्रस्तावना :-**

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१) मधील तरतुदीनुसार सहकारी संस्थांच्या संचालक मंडळातील कोणतेही नैमित्तिक रिक्त पदाची निवडणूक घेण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त आहेत. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ७४(१) मधील तरतुदीनुसार संस्थेच्या निवडून आलेल्या समिती सदस्याचा मृत्यू, राजीनामा, अनर्हता किंवा पदावरुन काढून टाकणे यामुळे अथवा असा सदस्य त्याचा पदावधी संपण्यापूर्वी किंवा अन्यथा कामकाज करण्यास अक्षम ठरल्यामुळे पद रिक्त झाले असेल तर, संस्थेची समिती, असे पद रिक्त झाल्याबद्दल तात्काळ राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास व जिल्हा सहकारी निवडणूक अधिका-यास कळवील आणि असे कळविल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत असे रिक्त पद ज्या सदस्यांच्या प्रवर्गातून रिक्त झाले असेल त्या प्रवर्गातील उर्वरीत पात्र सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे समितीच्या सदस्यांच्या बैठकीत भरण्याचे अधिकार संस्थेस प्राप्त आहेत. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ७४ मधील परंतूकानुसार समितीच्या पदावधीमध्ये कोणत्याही परिस्थितीत समितीच्या एकूण सदस्य संख्येच्या १/३ पेक्षा अधिक सदस्य नामनिर्देशित केले जाणार नाहीत. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ७४ (२) मधील तरतुदीनुसार नैमित्तिक रिक्त जागांवर नामनिर्देशनाने निवडून आलेला किंवा नामनिर्देशीत केलेला सदस्य जर पद रिक्त झाले नसते तर समितीचा सदस्य म्हणून ज्या सदस्याच्या जागी तो निवडून आला असेल त्या सदस्याने ज्या कालावधीपर्यंत पद धारण केले असते केवळ तेवढया कालावधीपर्यंत पद धारण करेल. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ७४ नुसार संस्थेने नैमित्तिकपणे रिक्त झालेली पदे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या प्राधिकृत केलेल्या अधिका-याच्या अध्यक्षतेखाली समितीच्या उर्वरीत सदस्यांच्या बैठकीत भरणे अनिवार्य आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ७४ मधील तरतुदीनुसार नैमित्तिकपणे रिक्त झालेल्या जागा भरण्यासाठी बोलविण्यात येणाऱ्या संचालक मंडळाच्या सभेकरीता अध्यासी अधिकारी नेमण्याचे अधिकार प्राधिकरणास प्राप्त आहेत. आणि,

ज्या अर्थी, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने वाचावे क्र. ३ च्या आदेशानुसार "ब", "क" व "ड" वर्गातील सहकारी संस्थांच्या नैमित्तिकपणे रिक्त झालेल्या जागा भरण्यासाठी बोलविण्यात येणाऱ्या संचालक

मंडळाच्या सभेकरीता अध्यासी अधिकारी नेमण्याचे प्राधिकरणाचे अधिकार संबंधित जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना प्रदान केलेले आहेत. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ८० मधील तरतुदीनुसार प्रत्येक निवडणूकीवेळी मतदानाची गुप्तता राखणे हे निवडणूक प्रयोजनार्थ नेमलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचे कर्तव्य/जबाबदारी आहे. आणि,

ज्या अर्थी, नैमित्तिक रिक्त पद निवडणूकीची कार्यपध्दती निश्चीत करणे आवश्यक झालेले आहे. आणि, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (पाच) मधील तरतुदीनुसार निवडणूक सुरळीतपणे व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी अधिनियम व नियम यातील तरतुदीशी सुसंगत आदेश पारीत करण्याचे अधिकर राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त आहेत. आणि,

त्या अर्थी, प्राधिकरण नैमित्तिक रिक्त पद निवडणूकीची कार्यपध्दती निश्चीत करणे संदर्भात खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**-:: आदेश ::-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१), महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (पाच) व नियम ७४ अन्वये प्राप्त अधिकारानुसार प्राधिकरण नैमित्तिक रिक्त पद निवडणूकीसंदर्भात खालीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चीत करीत आहे.

१. अध्यासी अधिकारी यांनी नैमित्तिक रिक्त पदे भरण्याकरीता संस्था पोटनियमातील संबंधित तरतुदीनुसार संचालक मंडळ सभेचे आयोजन करावे.
२. अध्यासी अधिकारी यांनी ज्या प्रवर्गामधून/मतदारसंघातून जागा रिक्त झालेली आहे त्या प्रवर्गातील उमेदवारांची निवड करण्यात येईल हे स्पष्टपणे नमुद करावे.
३. अध्यासी अधिकारी यांनी नैमित्तिकपणे रिक्त झालेल्या जागा भरण्यासाठी बोलविण्यात येणाऱ्या संचालक मंडळाच्या सभेकरीता फक्त नैमित्तिक रिक्त पद निवडीच्या विषयाचा समावेश करूनच नोटीस निर्गमित करावी. **(परिशिष्ट-१)**
४. अध्यासी अधिकारी यांनी सदर नोटीसीमध्ये निवडणूक कार्यक्रमाचा समावेश करावा. निवडणूक कार्यक्रमात नामनिर्देशन पत्र वाटप व स्विकृती, नामनिर्देशन पत्राची छाननी, वैध नामनिर्देशन पत्राची यादी प्रसिध्दी, नामनिर्देशन पत्र माघार, अंतीम उमेदवारांची यादी जाहीर करणे, मतदान, मतमोजणी व निकाल घोषित करणे या बाबींचा प्रामुख्याने समावेश करावा.
५. अध्यासी अधिकारी यांनी सदरची नोटीस सर्व समिती सदस्यांना पोहोच झाली असल्याची खात्री करावी.
६. अध्यासी अधिकारी यांनी सभेची नोटीस पाठवल्याचा दिनांक व बैठकीचा दिनांक (दोन्ही दिवस वगळून) यांत सात दिवसापेक्षा कमी कालावधी असू नये याची दक्षता घ्यावी.
७. संबंधित प्रवर्गातील इच्छुक सदस्यांना सदर पदासाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याकरीता अध्यासी अधिकारी यांनी सभेची नोटीस संस्था व निबंधक कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द केल्याची खात्री करावी. तसेच "अ" व "ब" वर्गातील सहकारी संस्थांच्या बाबतीत सभेची नोटीस जास्तीच्या खपाच्या स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करावी.
८. इच्छुक सभासदांनी आपल्या नामनिर्देशन पत्रासोबत रिक्त पदासाठी पात्र असलेबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कअ व नियम १९६१ व संस्थेचे मंजूर उपविधीनुसार संचालक

होणेस अपात्र नाही असे घोषणापत्र अध्यासी अधिकारी यांचेकडे नामनिर्देशन पत्रासोबत सादर करावे. **(परिशिष्ट-२ व परिशिष्ट-३)**

९. नामनिर्देशन पत्राला समिती सदस्यांपैकी एका सदस्याने सुचन करावे व एका सदस्याने अनुमोदन करावे.

१०. अध्यासी अधिकारी यांनी सभेचे आयोजन करताना पूर्व इतिहास, न्यायप्रविष्ठ प्रकरणे, गटातटाचे राजकारण इत्यादी बाबी विचारात घेऊन सदरची सभा कायदा व सुव्यवस्था पालन करून पूर्ण होण्याकरीता आवश्यकतेप्रमाणे पोलिस बंदोबस्ताचे/व्हिडीओ शुटींगचे आयोजन करावे.

११. अध्यासी अधिकारी यांनी उपविधीत नमुद गणपुर्ती झाल्यानंतर उपस्थित संचालकांच्या उपस्थितीची स्वाक्षरी घेऊनच संचालक मंडळाच्या पदाधिकारी निवडीकरीता आयोजित सभेचे कामकाज सुरु करावे.

१२. अध्यासी अधिकारी यांनी सभेच्या इतिवृत्ताची नोंद संचालक मंडळाच्या मुळ इतिवृत्तांत नोंदवहीत करावी.

१३. पदाधिकारी निवडणूक गुप्त मतदान पध्दतीने करावी.

१४. अध्यासी अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्राच्या छाननीवेळी दाखल नामनिर्देशन पत्राच्या आक्षेपांची संक्षिप्त चौकशी करून निर्णय पारीत करावा.

१५. अध्यासी अधिकारी यांनी जेवढी पदे निवडून दयावयाची आहेत तेवढे नामनिर्देशन पत्र प्राप्त झालेली असल्यास सदर व्यक्ती छाननीअंती बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर करावे. मात्र जेवढी पदे निवडून दयावयाची आहेत त्या संख्येपेक्षा जास्त नामनिर्देशन पत्र प्राप्त झाल्यास अध्यासी अधिकारी यांनी गुप्त मतदानाचे नियोजन करावे व उपस्थित संचालकांना मतपत्रिका देण्याची व्यवस्था करावी.

१६. अध्यासी अधिकारी यांनी मतमोजणी नंतर निकाल जाहीर करावा.

१७. संचालक मंडळाच्या सभेचे कामकाजाचे इतिवृत्तांत तयार करून इतिवृत्तांत तयार करुन इतिवृत्तांत प्रत जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे सादर करावी.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मान्यतेने.**

सोबत-परिशिष्ट १ ते ३

(यशवंत गिरी)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना :-**

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व).
२. तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व).

**या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. /सन २०२२ सोबत जोडलेले परिशिष्ट १**

**......... सहकारी संस्था मर्या......., ता. ..........., जि. ...........**

जा.क्र. दिनांक :-

**नोटीस मसूदा**

................सहकारी संस्था मर्या. ............ ता..........., जि............ या सहकारी संस्थेच्या सर्व संचालकांना सूचित करण्यात येते की, आपल्या सहकारी संस्थेच्या संचालक मंडळातील -------- या प्रवर्गातील/मतदारसंघातील संचालक/संचालकांच्या निवडीकरीता अध्यासी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक / /२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता --------------- या ठिकाणी संचालक मंडळ सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे, सर्व संचालकांनी संचालक मंडळाच्या सभेस हजर राहण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे. सभेत नैमित्तिकपणे रिक्त झालेली पदे निवडीसाठी खालील निवडणुक कार्यक्रमानुसार कामकाज करण्यात येणार आहे.

**निवडणुक कार्यक्रम**

| अ.क्र. | तपशील | वेळ |
|---|---|---|
| १ | नामनिर्देशन पत्र वाटप व स्वीकृती | सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० |
| २ | नामनिर्देशन पत्र छाननी | दुपारी १२.०० ते दुपारी १२.३० |
| ३ | वैध नामनिर्देशन पत्राची यादी प्रसिध्दी | दुपारी १.०० |
| ४ | नामनिर्देशन पत्र माघार | दुपारी १.०० ते दुपारी १.३० |
| ५ | अंतीम उमेदवाराची यादी जाहिर करणे. | दुपारी १.३० |
| ६ | मतदान प्रक्रिया | दुपारी २.०० ते दुपारी २.३० |
| ७ | मतमोजणी प्रक्रिया | दुपारी २.३० ते दुपारी ३.०० |
| ८ | निवडून आलेल्या पदाधिका-यांबाबत निकाल घोषीत करणे. | दुपारी ३.०० |

**टिप :- निवडणूक कार्यक्रमातील वेळेत फेरबदल करण्याचे अधिकार अध्यासी अधिकारी यांचे राहतील.**

(मा. अध्यासी अधिकारी यांचे मान्यतेने )

दिनांक :- स्वाक्षरी

ठिकाण :- सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी/व्यवस्थापकीय संचालक

**प्रत,**

१. श्री ............................................. संचालक
२.श्री................................................संचालक
३.
४.
५.
६.
७.

**प्रत माहितीस्तव : -**

जिल्हा/ तालुका/प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी.

**या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. /सन २०२२ सोबत जोडलेले परिशिष्ट २**

**......... सहकारी संस्था मर्या.......,**

**ता. ..........., जि. ...........**

जा.क्र. दिनांक :-

## नामनिर्देशन पत्राचा नमुना

------------- सहकारी संस्था मर्यादित --------- तालुका------ जिल्हा -----ची नैमित्तिक रिक्त पदाची निवडणूक

मी, याद्वारे श्री/श्रीमती ------------------ यांना -------------- या मतदार संघातून उमेदवार म्हणून नामनिर्देशित करीत आहे.

उमेदवाराचे पूर्ण नाव :

उमेदवाराचा संपूर्ण पत्ता :

वय :

प्रवर्ग/मतदारसंघाचे नाव :

१. राखीव जागा असलेल्या मतदार संघात उमेदवार ज्या जातीचा किंवा जमातीचा किंवा विमुक्त जातीचा असेल त्या जातीचा किंवा जमातीचा किंवा विमुक्त जातीचा उल्लेख करावा.

२. प्रवर्ग/ मतदारसंघाचे नाव

३. सुचकाचे नाव :

**सुचकाची स्वाक्षरी**

४. अनुमोदकाचे नाव:

**अनुमोदकाची स्वाक्षरी**

**या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र.      /सन २०२२ सोबत जोडलेले परिशिष्ट ३**

**......... सहकारी संस्था मर्या.......,**

**ता. ..........., जि. ...........**

जा.क्र. दिनांक :-

**नामनिर्देशन पत्रासोबत उमदवाराने दाखल करावयाचे**
**घोषणापत्र**

मी, याद्वारे घोषित करतो की, नामनिर्देशित झाल्यास, संस्थेच्या समितीचा सदस्य म्हणून सेवा करणेची माझी तयारी आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३ कअ, नियम १९६१ व उपविधीमध्ये नमुद केलेली कोणतीही अपात्रता मी धारण करीत नाही.

(अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती /इतर मागासवर्ग/भटक्या जमाती/विमुक्त जाती/विशेष मागास प्रवर्ग यांतील) उमेदवाराने कलम ७३ ब अन्वये द्यावयाचे प्रतिज्ञापत्र.

मी, ---------------- या जाती / जमाती मधील असून सदरची जात / जमात ही महाराष्ट्रामध्ये ----------- या राखीव प्रवर्गात मोडते. मी सदरच्या प्रवर्गात मोडत असल्याचे सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या, जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकन केलेली छायांकित प्रत सोबत जोडत आहे.

उमेदवाराचे नाव :-------------------

दिनांक :-----------

उमेदवाराची स्वाक्षरी